पुण्यनगरी
गुरुवार, २० डिसेंबर २०१८

## विवेकानंदच्या विद्यार्थ्यांची मातोश्री वृद्धाश्रमास भेट

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
विवेकानंद महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागातील विद्यार्थी, विद्यार्थिनी, प्राध्यापकांनी मातोश्री वृद्धाश्रमास भेट दिली. यावेळी मातोश्रीच्या अध्यक्षा वैशाली राजशेखर, अपूर्वा चिटणीस यांनी कुटुंब व्यवस्थेतील आजी-आजोबा आणि नातवांचे संबंध पटवून दिले. समाजशास्त्र विभागप्रमुख प्रा. एच. व्ही. चामे यांनी मार्गदर्शन केले. प्रा. डॉ. राज चव्हाण, प्रा. विकास मस्के आदी उपस्थित होते.

## विवेकानंदच्या विद्यार्थिनींचे यश

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
बारामतीतील शारदाबाई पवार महिला महाविद्यालयात झालेल्या स्वयंसिद्धा युवती संमेलनात विवेकानंद कॉलेजच्या विद्यार्थिनींनी उत्तुंग यश मिळवले. यामध्ये नूपुर कदमने 'माझे महाविद्यालय' या मुख्य विषयांतर्गत प्लास्टिक निर्मूलनातून पर्यावरणाचे संरक्षण व पाणी प्रदूषण रोखण्याचे उपाय या दोन उपविषयांवर पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन करून दुसरा क्रमांक पटकावला. तेजल पाटीलने 'मी यूथ आयकॉन' या विषयावर विविध स्पर्धांमध्ये मिळवलेल्या नैपुण्याचे पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन करून दुसरा क्रमांक मिळवला. अपेक्षा पाटीलनेही याच विषयावर उत्तेजनार्थ पारितोषिक मिळवले.

पुण्यनगरी
गुरुवार, २० [illegible]बर २०१८

## विवेकानंद कॉलेजमध्ये शनिवारी विद्यार्थ्यांचा गौरव

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
विवेकानंद कॉलेजचा सन २०१८-१९ या वर्षीचा गुणी विद्यार्थी गौरव समारंभ शनिवार, दि. २२ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता महाविद्यालयात आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा पोलीसप्रमुख अभिनव देशमुख उपस्थित राहणार असून, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्याध्यक्ष प्रा. अभयकुमार साळुंखे राहणार आहेत.

या कार्यक्रमामध्ये शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये कला, क्रीडा, शैक्षणिक, एन.सी.सी., एन.एस.एस. विभागांत उल्लेखनीय यश मिळविलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन गौरवण्यात येणार आहे.

पुढारी
गुरुवार
२० डिसेंबर २०१८

## विवेकानंद महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची मातोश्री वृद्धाश्रमास भेट

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** विवेकानंद महाविद्यालयाच्या समाजशास्त्र विभागाच्या विद्यार्थी व प्राध्यापकांनी नुकतीच मातोश्री वृद्धाश्रमाला भेट दिली. या भेटीत विद्यार्थ्यांनी येथील वृद्धांशी संवाद साधून मिळणाऱ्या सोई सुविधांची माहिती घेतली. त्यांना फळांचे वाटप करण्यात आले. प्रा. एच. व्ही. चामे म्हणाले, आई-वडील यांची मने जपून मुलांनी त्यांचा आधार बनले पाहिजे. यावेळी प्रा. डॉ. राज चव्हाण, प्रा. विकास मस्के आदी उपस्थित होते. प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली भेटीचे आयोजन करण्यात आले.

०/१२/१८

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with OKEN Scanner